**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४ब २८ अन्वये सहकारी गृहनिर्माण संघास अधिसूचित करण्यासाठी निकष विहित करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**परिपत्रक क्रमांक: संकिर्ण-१९२५/प्र.क्र.१९४/१३-स**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६

## प रि प त्र क

राज्यात सध्या कार्यरत असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कामकाजाचे स्वरूप व व्याप्ती विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सन २०१९ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण १३ब समाविष्ट करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील कलम १५४ब-२८ मध्ये गृहनिर्माण महासंघ, त्याचे अधिकार व कर्तव्ये याबाबत तरतूद करण्यात आली आहे. सदर कलमाच्या उपकलम (१) मध्ये संस्थेस राजपत्रातील अधिसूचनेव्दारे गृहनिर्माण महासंघ म्हणून अधिसूचित करण्याची तरतूद आहे. अशा संस्थेस गृहनिर्माण महासंघ म्हणून अधिसूचित करण्यासाठी काही निकष निश्चित करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दि. १९/१२/२०२५ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावानुसार कलम १५४ब-२८ मधील प्रयोजनासाठी एखाद्या संस्थेला गृहनिर्माण महासंघ म्हणून अधिसूचित करण्यासाठी निकष निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सदर परिपत्रकाव्दारे खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत.

**<u>निकष</u> :-**

१) सहकारी गृहनिर्माण संघ हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार नोंदणीकृत असावा आणि सदर संस्था किमान ५ वर्षापासून कार्यरत असली पाहीजे.

२) संस्थेचे किमान जिल्हा कार्यक्षेत्र असावे.

३) सदर संस्थेकडे किमान ६५० चौ. फूट क्षेत्राचा एक प्रशिक्षण वर्ग असावा. प्रशिक्षणाची अद्ययावत व सुसज्ज साधने (उदा. संगणक कक्ष, डिजीटल क्लास घेता येईल अशी क्लासरुम, ग्रंथालय इ.) असणे आवश्यक आहे.

४) संस्थेच्या उपविधीमध्ये अथवा उद्देशामध्ये शिक्षण व प्रशिक्षणाची तरतूद असणे आवश्यक आहे.

५) संस्थेकडे किमान एक प्रशिक्षक असावा.

६) संस्थेकडे प्रख्यात व अनुभवी व्याख्यात्यांची नामतालिका असणे आवश्यक आहे.

७) संस्थेकडे २ प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी असणे आवश्यक आहे.

८) संस्थेचे अद्ययावत वैधानिक लेखापरिक्षण झालेले असावे.

ज्या संस्था उपरोक्त निकष पूर्ण करु शकतात त्यांनी यासोबत परिशिष्ठ अ मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रासह संस्थेचे मुख्यालय ज्या ठिकाणी आहे अशा ठिकाणच्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे संस्थेस गृहनिर्माण महासंघ म्हणून अधिसूचित करण्यासाठी मान्यता मिळण्याचा परिपूर्ण प्रस्ताव चार प्रतीमध्ये दाखल करावा.

सदर प्रस्तावास अनुसरुन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी सदर संस्थेस भेट देवून उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या निकषानुसार सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्याबाबत पाहणी करावी व प्रस्ताव आपल्या स्पष्ट अभिप्रायासह सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावा. सहकार आयुक्त व निबंधक यांचे स्तरावर संबंधित प्रस्तावाची छाननी करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - अध्यक्ष
२. अप्पर निबंधक, प्रशासन - सदस्य
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ - सदस्य
४. संबंधित विभागाचे विभागीय सहनिबंधक - सदस्य
५. उपनिबंधक, कायदा व वैधानिक कार्यवाही - सदस्य सचिव

उपरोक्त समितीने प्रस्तावाची काटेकोरपणे छाननी करावी व समितीला आवश्यक वाटल्यास स्वतंत्र प्रतिनिधी मार्फत स्थळ पाहणी करावी. संस्था सर्व निकषांची पूर्तता करीत आहे अशी खात्री झाल्यावर सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी शासनाकडे अशा संस्थेचा स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव सादर करावा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२७१५३५२७११०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c329798028660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2026.02.27 15:36:33 +05'30'

**( तेजल र. पारडे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
२. मा. राज्यमंत्री (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
३. प्रधान सचिव (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. निवडनस्ती-१३स.

# परिशिष्ट अ

१. संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता (सोबत पुरावा जोडावा).

२. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

३. संस्थेचे जिल्हा कार्यक्षेत्र दर्शविणारी उपविधीची प्रत.

४. संस्थेकडील प्रशिक्षण वर्गाच्या क्षेत्राबाबत तपशील व कागदपत्रे. प्रशिक्षणाची अद्ययावत व सुसज्ज साधने उदा. संगणक कक्ष, डिजीटल क्लास घेता येईल अशी क्लासरुम, ग्रंथालय इ. बाबत तपशील तसेच प्रशिक्षण वर्ग इमारतीचे मालमत्ता पत्रक / भाडे करार इ. ची प्रत.

५. संस्थेच्या उद्देशामध्ये शिक्षण व प्रशिक्षणाची तरतूद दर्शविणारी उपविधीची प्रत.

६. संस्थेकडील प्रशिक्षकाच्या नियुक्तीपत्राची प्रत, त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबत कागदपत्र.

७. संस्थेकडील प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्तीपत्राची प्रत, त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबत कागदपत्र.

८. संस्थेकडील प्रख्यात व अनुभवी व्याख्यात्यांच्या संमतीपत्राच्या प्रती, त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबत कागदपत्र.

९. संस्थेच्या अद्ययावत लेखापरिक्षण अहवालाची प्रत.

**स्वाक्षरी/-**

**संस्थेचे अध्यक्ष / व्यवस्थापक**